**राजपत्रित राज्य शासकीय अधिकाऱ्यांना मोटार कार खरेदी करण्यासाठी अग्रिम मंजूर करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय, क्रमांक-अग्रिम २०११/प्र.क्र.५७/२०११/ विनियम
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: १७ फेब्रुवारी, २०१२.

वाचा :
१) शासन निर्णय, वित्त विभाग, अग्रीम-१०९९/प्र.क्र.३६/९९/विनियम, दि.३० मार्च, २०००.
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.अग्रिम-१०.०५/प्र.क्र.१८/२००५/विनियम, दि.२०.०६.२००५
३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.विअप्र-१०.०८/प्र.क्र.७०/२००८/विनियम, दि.१५.५.२००९
(वित्तीय अधिकार प्रदान करणे संदर्भात)
४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.अग्रिम-२०१०/प्र.क्र.२५/१०/विनियम, दि.१५.०७.२०१०.
५) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.अग्रिम-१०९५/प्र.क्र.७०/९५/विनियम, दि.२६.९.१९९५.
(दंडनीय व्याज आकारण्या संदर्भात)

AB-10
5/4/12

**प्रस्तावना**

शासन अधिसूचना वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.२७/सेवा-९, दि २२ एप्रिल, २००९ अन्वये राज्य शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांच्या वेतनश्रेणी दिनांक १ जानेवारी, २००६ पासून सुधारित करण्यात आल्या आहेत. या सुधारित वेतन संरचनेतील वेतन बँड मधील वेतन विचारात घेऊन(ग्रेड-पे वगळून) संदर्भाधीन शासन निर्णय, दि.१५ जुलै, २०१० अन्वये राजपत्रित राज्य शासकीय अधिकाऱ्यांना नवीन मोटार कार खरेदी करण्यासाठी अग्रिम मंजूरीकरीता वेतन मर्यादा सुधारीत करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयान्वये सध्या मिळत असलेल्या मोटार कार अग्रिमाच्या रकमेत वाढ करण्याचा तसेच जुन्या मोटार कार खरेदीच्या अग्रिमासाठीही सुधारित वेतन संरचनेतील वेतन बँडमधील वेतन विचारात घेण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. या संदर्भात शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय**

प्रस्तावनेतील संदर्भाधीन अ.क्र. १,२ व ४ मधील शासन निर्णयात सुधारणा करुन शासन असे आदेश देत आहे की, नवीन किंवा जुनी मोटार कार खरेदीसाठी राजपत्रित राज्य शासकीय अधिकाऱ्यांना मुंबई वित्तीय नियम १९५९ मधील नियम १३६ आणि संदर्भाधीन अ.क्र.३ मधील वित्तीय अधिकार नियमपुस्तिका, १९७८, भाग-दोन, उपविभाग एक, अ.क्र.१९, नियम क्र.१३६ मधील अटींच्या अधीन तसेच खाली नमूद केलेल्या अटींच्या अधीन सुधारित वेतन संरचनेनुसार खालील प्रमाणे अग्रिम अनुज्ञेय राहील.

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
आवक नं.
27 MAR 2012
विशेष नोंद वही नं.
शाखा वितरण नं.
लिपिक नि.उ.जि. जिल्हाधिकारी

TAHSILDAR GENERAL
COLLECTORATE RATNAGIRI

(आ) "नवीन किंवा जुनी मोटार कार खरेदीसाठी अग्रिम" मंजूरीकरीता लागू असलेल्या अटी :-

१) सुधारित वेतनबँड मधील मासिक वेतन रु.१९,५३०/-(ग्रेड वेतन वगळून) किंवा अधिक आहे अशा राजपत्रित अधिकाऱ्यांना या प्रयोजनार्थ अग्रिम अनुज्ञेय राहील.

२) सदर अग्रिमावर शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या दराने व्याज आकारण्यात यावे.

३) अग्रिमासाठी अर्ज करणाऱ्या अधिकाऱ्याची शासनाच्या सेवेतील नियुक्ती संबंधित पदाच्या सेवाभरती नियमानुसार करण्यात आलेली असली पाहिजे आणि अशाप्रकारे करण्यात आलेल्या नियुक्तीनंतर कमीत कमी ५ वर्षाची सलग सेवा झाली असली पाहिजे.

४) मोटार कार ज्या महिन्यात खरेदी केली असेल त्याच्या पुढील महिन्यापासून अग्रिमाच्या वसुलीस सुरुवात करण्यात यावी.

५) मोटार कार अग्रीम मंजूरीच्या दिनांकापासून १ महिन्याच्या आत अग्रिम धारकाने मोटार कार खरेदी करावी व त्यासंबधीची कागदपत्रे शासनास सादर करावीत. तसे न केल्यास अग्रिम धारकाकडून अग्रिमाची संपूर्ण रक्कम १ महिन्यानंतर दंडनीय व्याजासह एक रकमी वसूल करण्यात यावी.

६) गहाण खतामध्ये मोटार कारचा मेक(MAKE), मॉडेल(MODEL) आणि चेसिस क्रमांक (CHASSIS NO.) स्पष्टपणे नमूद करण्यात यावा.

७) मोटार वाहन चालविण्यासाठी सक्षम प्राधिका-यांकडून, कुटुंबातील एका व्यक्तिला मिळालेल्या कायम अनुज्ञप्तीची (Permanent Licence) छायाप्रत सादर करणे आवश्यक राहील.

८) खरेदी करावयाच्या मोटार कार च्या उत्पादनाचे वर्ष, खरेदीची तारीख व त्या संदर्भाचे नोंदणीचे कागदपत्र सादर करण्यात यावेत.

९) शासकीय विमा निधीकडे मोटार कारचा विमा उतरविण्यात यावा व तो सतत चालू राहील याची दक्षता घेण्यात यावी.

१०) अर्जदाराने आवश्यक बाबींची पूर्तता केल्यानंतर सक्षम प्राधिकारी, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, अनुसार प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकाराप्रमाणे मोटार कार अग्रिम मंजूर करु शकतील. असे अग्रिम मंजूर केल्यानंतर मंजूरी आदेशाची प्रत इतर सर्व संबंधित लेखापरीक्षा अधिकारी व वित्त विभागाला पाठवावी.

११) अग्रीम मंजूर करताना मुंबई वित्तीय नियम-१९५९ मधील नियम १२४(बी) व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे लागू ठरणाऱ्या दंडनीय व्याजाचा उल्लेख मंजूरीच्या आदेशात करण्यात यावा.

१२) मोटार कार अग्रिमाची व्याजासह पूर्ण परतफेड होईपर्यंत मोटार कार शासनाकडे गहाण राहील. त्यासाठी संबधित अधिकाऱ्यांस विहित नमुन्यात व कार्यपध्दतीप्रमाणे गहाणखत भरुन देणे आवश्यक राहील. तसेच असे गहाणखत भरुन देण्यापूर्वी सदर मोटार कार यांत्रिकी दृष्ट्या निर्दोष आहे याची जबाबदारी अग्रिम घेणाऱ्या संबंधित अधिकाऱ्याची राहील. त्याप्रमाणे जर एखाद्या प्रसंगी यांत्रिकी दृष्ट्या निर्दोष नसलेली मोटार कार शासनाकडे गहाण ठेवली गेल्यास व अशा मोटार कारच्या अग्रिमाच्या वसूलीसाठी लिलावाने विक्री करण्याचा प्रसंग उद्भवल्यास अशा लिलावापासून येणाऱ्या रक्कमेपेक्षा शिल्लक राहणारी वसूलपात्र रक्कम दंडनीय व्याजासह संबंधित अधिकाऱ्याच्या सेवा उपदान, रजेचे रोखीकरण इत्यादी अनुज्ञेय रकमांमधून वसूल

करण्यात यावी. नवीन किंवा जुनी मोटार कार अग्रिम धारकाकडून नियमानुसार आवश्यक ते विहित नमुन्यातील करारपत्र(नमुना-२०), गहाण बंधपत्र (नमुना-२१, २१ए) दुय्यम बंधपत्र(नमुना-२२) व प्रतीभूती बंधपत्र(नमुना-२२ ए) घेण्यात यावीत.

१३) अग्रिमासाठी अर्ज करणाऱ्या अधिकाऱ्याची सेवानिवृत्तीपूर्वी व्याजासह संपूर्ण अग्रीम रक्कम परतफेड करण्याची क्षमता असल्याची, अग्रीम मंजूर करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्याची अग्रीम मंजूरीपूर्वी खात्री असावी.

१४) "मोटार कार अग्रिम" या प्रयोजनार्थ शासकीय सेवेच्या कालावधीत एकदाच अग्रिम अनुज्ञेय राहील. दुसऱ्यांदा उपरोक्त अग्रिम अनुज्ञेय करता येणार नाही.

(ब) "नवीन मोटार कार" खरेदीच्या अग्रिमासाठी अतिरिक्त असलेल्या अटी :-

१) नवीन मोटार कार खरेदीसाठी अग्रिमाची रक्कम ,अधिकाऱ्याच्या वेतन बँड मधील मासिक वेतनाच्या १७ पट किंवा रु.३,५०,०००/-( रुपये तीन लक्ष पन्नास हजार फक्त) किंवा नवीन मोटार कारची प्रत्यक्ष किंमत यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी अनुज्ञेय राहील.

२) नवीन मोटार कार खरेदी करण्यासाठी मंजूर करण्यात येणाऱ्या अग्रिमाची वसूली करताना प्रथमत: मुद्दलाची १०० समान मासिक हप्त्यात वसूली करावी व त्यानंतर व्याजाची वसूली ६० मासिक हप्त्यात करावी. मात्र एखादा अधिकारी नियतवयोमानानुसार उपरोक्त मासिक हप्त्याचे १६० महिने पूर्ण होण्यापूर्वीच सेवानिवृत्त होणार असेल तर त्याच्या सेवानिवृत्तीपूर्वी संपूर्ण अग्रिमाची व्याजासह वसूली होईल, अशा प्रकारे वसूलीचे हप्ते निश्चित करण्यात यावे.

३) नवीन मोटार कार अग्रीम मंजूरीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत मान्यता प्राप्त विक्रेत्याकडून खरेदी करण्यात यावी व तसे कागदपत्र शासनास सादर करावेत.

(क) "जुनी मोटार कार" खरेदीच्या अग्रिमासाठी अतिरिक्त असलेल्या अटी :-

१) जुनी मोटार कार खरेदी करण्यासाठी अग्रिमाची रक्कम अधिकाऱ्याच्या वेतन बँड मधील मासिक वेतनाच्या ८ पट एवढी रक्कम किंवा रु.१,७५,०००/-( रुपये एक लक्ष पंच्याहत्तर हजार फक्त) किंवा जुन्या मोटार कारची प्रत्यक्ष किंमत यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढा अग्रिम अनुज्ञेय राहील.

२) जुनी मोटार कार खरेदी करण्यासाठी मंजूर करण्यात येणाऱ्या अग्रिमाची वसूली करताना प्रथमत: मुद्दलाची ५० समान मासिक हप्त्यात वसूली करावी व त्यानंतर व्याजाची वसूली ३० हप्त्यात करावी. मात्र एखादा अधिकारी नियतवयोमानानुसार उपरोक्त मासिक हप्त्याचे ८० महिने पूर्ण होण्यापूर्वीच सेवानिवृत्त होणार असेल तर त्याच्या सेवानिवृत्तीपूर्वी संपूर्ण अग्रिमाची व्याजासह वसूली होईल, अशा प्रकारे वसूलीचे हप्ते निश्चित करण्यात यावे.

३) जुनी मोटार कार, अग्रीम मंजूरीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत खरेदी करण्यात यावी व तसे कागदपत्र शासनास सादर करावेत.

४) खरेदी करावयाची जुनी मोटार कार ५ वर्षापेक्षा जुनी नसावी.

२. नवीन/जुनी मोटार कार अग्रिम मंजूरीसाठी आवश्यक असलेल्या निधीसाठी प्रत्येक प्रशासकीय विभागाने पुढील लेखाशिर्षाखाली वित्त विभागातील अर्थसंकल्प कक्षाच्या मान्यतेने आवश्यक अर्थसंकल्पिय तरतूद करावी व त्यानंतरच अग्रिम मंजूर करावा.

प्रधान लेखाशीर्ष :- ७६१०, शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे.

गौणशीर्ष :- २०२, मोटार वाहन खरेदीसाठी अग्रिम.

३. मुंबई वित्तीय नियम-१९५९ मधील संबंधित नियम १३६ मध्ये आवश्यक ती सुधारणा यथावकाश करण्यात येईल.

४. हे आदेश सदर शासन निर्णयाच्या दिनांकापासून अंमलात येतील.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक क्र २०१२०२०१०६०६१६३१६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(वि.र्का. चौधरी)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

- प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई २०
- महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई २०
- महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
- महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर

राज्यपालांचे सचिव
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
उप मुख्य मंत्र्यांचे प्रधान सचिव
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सहाय्यक
सर्व विधानमंडळ सदस्य
मंत्रालयातील सर्व प्रशासकीय विभागांचे अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
मंत्रालयातील सर्व प्रशासकीय विभाग
अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे(पूर्व), मुंबई ४०० ०५१
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकणभवन, नवी मुंबई

- प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
- प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपील शाखा), मुंबई
- प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, कुटीर क्र.३ व ४, अधिदान व लेखा कार्यालय आवार, मुंबई
- प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
- सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
- प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मादाम कामा रोड, मुंबई
- प्रमुख न्यायाधीश, कुटुंब न्यायालय, नागपूर / मुंबई, वांद्रे, मुंबई ४०० ०५१
- निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली.
- महासंचालक

संचालक, लेखा व कोषागारे, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई/ नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक/ अमरावती
उप मुख्य लेखा परीक्षक (परिक्षा), स्थानिक निधी लेखा, कोकण विभाग कोकण भवन, नवी मुंबई/ पुणे/ नागपूर/ औरंगाबाद / नाशिक/ अमरावती
कोषागार अधिकारी
मंत्रालयाच्या सर्व प्रशासकीय विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख आणि कार्यालय प्रमुख
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
महाराष्ट्र राज्य मानवी आयोग, गृहनिर्माण भवन, वांद्रे(पूर्व), मुंबई-५१
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
संचालक (माहिती), महाराष्ट्र परिचय केंद्र, अ-६, स्टेट एम्पोरिया इमारत, बाबा खडकसिंग मार्ग, नवी दिल्ली ११०००१
बहुजन समाज पार्टी, डी-१, इन्द्रा हाऊसिंग, आझाद मैदान, मुंबई-१
भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कौन्सिल, ३१४, राजभुवन, एस.व्ही.पी. मुंबई-४
भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल ग्लेन व्हॅली, वरळी, मुंबई
इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कमिटी (आय) गांधी भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई २
नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई-२१
शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई २८.
वित्त विभागातील सर्व कार्यासन
निवड नस्ती, वित्तलेख, वित्त विभाग

---